Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P038

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And
Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# भारतीय ज्ञान परंपरेत मातंग दाईणीचे स्थान व सध्या स्थिती

**डॉ. माधुरी ब. चौधरी**
संशोधक
mdshankar768@gmail.com
Contact No. :-7559425332

प्रस्तावना

समाजातील धार्मिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात स्त्रिया महत्वाची भुमिका निभावत आहे. जगातील असे कुठलेही क्षेत्र नाही की ते क्षेत्र महिलांनी आपल्या कतृत्वाने पादाक्रांत केले नाही.

आधुनिकीकरण, जागतिकीकरण, महिला सशक्तीकरण, नवतंत्रज्ञान व वैज्ञानिक शोध या सर्वामुळे महिला आपल्या प्रगतीची शिखरे उंचावत आहेत. स्त्रियांची प्रगती होत आहे. त्या प्रगतीत कोणत्या स्त्रिया सहभागी होत आहेत ? ज्यांनी शासनाच्या सवलतीचा लाभ घेतला आहे. त्याच स्त्रियांनी प्रगती केली आहे असे म्हणता येईल कारण आजही आपण जेव्हा ग्रामीण क्षेत्रातील स्त्रियांचा विचार करतो तेव्हा शिक्षण, आरोग्य, उत्पन्न, राहणीमान, निर्णय प्रक्रिया व गतीशीलता या सर्वातच ती नागरी स्त्रीच्या तुलनेत मागासलेली दिसून येते.

वास्तविक पाहता ग्रामीण महिलांचा सहभाग आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये मोलाची भर पाडणारा असा आहे. श्रम विभाजनाच्या दृष्टिने पाहिले असता कृषी व्यवस्थेत तिचा वाटा 80 टक्के दिसून येतो. तरी देखील अज्ञान निरक्षरतेमुळे ती अशिक्षित आहे. स्वतःवरील अत्याचार, अन्याय ती मुकाटयाने सहन करीत आहे. याचे तिला भान नाही.

याचे मुळ भारतीय समाज व्यवस्थेत आहे. कारण भारतीय समाज हा पुरूष प्रधान असल्याने स्त्री ग्रामीण असो की शहरी असो त्यांची स्थिती सारखीच!

भारतीय समाज व्यवस्थेतील जातीय उतरंडी हीच स्त्रियांची सामाजिक स्थिति समजण्यासाठी लक्षात येणे महत्वाचे वाटते. प्रथम लिंग मग जाती व त्यानंतर वर्ग अशा तीन स्तरावरून भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांचे शोषण होते जेव्हा आम्ही अनुसुचित जातीच्या स्त्रियांचा विचार करतो तेव्हा त्यांना पराकोटीच्या शोषणास व उपेक्षेस सामोरे जावे लागते. अशाच एक अनुसुचित जातीतील स्त्री आहे 'मांग' स्त्री जी परंपरेने सुईण ( दाईण ) चे काम करत होती

येणा-या संदर्भातून मांग स्त्री ही समाजव्यवस्थेसाठी महत्वाची आहे. तिच्या सेवा प्रत्येक स्त्रीस हव्या होत्या व जेव्हा आपण म्हणतो की 40 ते 50 टक्के भारतातील बाळंतपण प्रशिक्षित दाई शिवाय होतात. तेव्हा मांग स्त्रीला आपण दुर्लक्षित करतो पण ती प्रत्येक स्त्रीस सेवा पुरवत असली तरी तिचा दर्जा, तिच्या जातीचा दर्जा व तिचा व्यवसाय हे समाजाने हीन ठरविला आहे.

कि वर्डस्
मातंग स़्त्री, मातंग स़्त्री सुईण ( दाईण ), ग्रामिण, अनुसूचित जाती, बाळंत आजार

प्रस्तुत अध्ययनाची उद्दिष्टये:

1) मातंग दायिणीच्या प्राचीनतेचा शोध घेणे.
2) मातंग दायिणीचे ग्रामीण क्षेत्रातील महत्व जाणून घेणे.

संशोधन पध्दती:

प्रस्तुत अध्ययनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग केला आहे.

''गावातील स्त्रियांचे बाळंतपणा करण्याचे अवघड काम मांग स्त्री सहज पार पाडायची आणि जंगलातील अनेक औषधीची माहिती तिला होती. दाईण व सुईण म्हणून मांग स्त्रीचे महत्व ग्रामीण क्षेत्रात आहे.' प्रा. सोमवंशी 'महाराष्ट्रातील मांग', पृ. क्र. 26' आज ही मांग स्त्री प्रत्येकाच्या जीवनाशी जुळलेली आहे. जन्म, नामकरण, विवाह, मृत्यु या संस्कारापासून तर गुढीपाडवा ते होळी पर्यंत प्रत्येक क्षेत्रात हिचे महत्व कायम आहे. मातंग स्वतःला या स्त्रीचे पुत्र म्हणतात. 'ते स्वतःला मातंगी मक्कळू म्हणतात. (डॉ. खडसे - 'मांग जात समाजशास्त्रीय अध्ययन' - पृ. क्र. 27).

''जगात भारतीय स्त्री श्रेष्ठ आणि भारतातील मांग स्त्री श्रेष्ठ ठरावी कारण आईच्या पोटात गर्भांकुर निर्माण झाल्यानंतर जीवनाचे दर्शन घडविणारी स्त्री म्हणजे मांग स्त्री'(वानखेडे चंद्रकांत 'मातंग प्राचीनता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा' - पृ. क्र. 117).

तिचे काम पुरोहितांपेक्षा श्रेष्ठ व वेगळे आहे कारण ''मांगीनीच्या या कामामुळे ती सर्व जातीच्या लोकांची गुरू आहे असे म्हटल्या जाते कारण गुरू आपल्या शिष्याचे जसे कान फुंकतो तसेच बाळ जन्मल्यावर सुईण मांग स्त्री नाका, कानातून फुंकर मारून आतील घाण बाहेर काढते''(R.V.Russell–The Tribes an castes of the Central Provinces of India – P. No.187 . 188).

विटाळ, स्त्री रोग, बाळ जन्म, बाळंतपण या सर्व कामामुळे ती सर्व जातीशी जुळलेली आहे ''मांग जात ही अस्पृश्य असून सुद्धा अनादी काळापासून मांगीण सुईणीचे काम करीत आली आहे. या कामात त्या अत्यंत निपुण असतात म्हणून की काय आज ही दवाखान्यात अद्यावत साधन सामग्री उपलब्ध असून सुद्धा बाळंतीणीजवळ मांगीण ठेवण्याचा व तिच्या हस्ते बाळंतपण करण्याचा प्रघात रूढ आहे'.(प्रा. सोमवंशी - 'भारतीय जाती संस्थेत मातंगाचे स्थान आणि महार मांग संबंध' - पृ. क्र. 59)

या मांग स्त्रीचे धार्मिक, आर्थिक क्षेत्रातही योगदान आहे. 'मरीआई' ही रोग निवारक देवता आहे. या देवतेच्या कोपापासून सुटका करण्यासाठी गांव बांधणीच्या कामामध्ये मांग स्त्री चा समावेश होतो. तिचा समावेश या पूजाविधीत महत्वाचा असतो(मांडे प्रभाकर 'गावगाडयाबाहेर' - पृ. क्र. 12-13)

लग्न समारंभामध्ये बलुतेदारास नवरदेवाच्या बाजुने विशेष महत्व असते आणि त्यात या मांग स्त्रीला फार मोठे मानाचे काम मिळते. कुंभार हत्ती घेऊन उभा असतो. माळीण फुलहार, घेऊन व कोळीण पाण्याची घागर ओतते, न्हावी आरसा दाखवितो, मांग स्त्री नवरदेवाला ओवाळते

परंपरेने एवढी महत्वाची कामे या स्त्रीद्वारे केली जात असतांना देखील जातीव्यवस्थेत अस्पृश्य जातीत तिचा आंतरभाव होतो व त्यातून जातीय छळास ती बळी पडते. तसेच विकास व आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत नवीन आरोग्य सेवांचा सुळसुळाट होऊन मांगीणीच्या बाळजन्माच्या/सुईणीच्या कार्यातून अतोनात पैसा मिळतो हे तथाकथित सभ्य समाजाला उमजल्यावर ळलदवबवसवहल या विद्याशाखेअतंर्गत स्त्रीरोग व प्रसुती तज्ञांची एक फोज तयार

झाली आणी मातंगीचे जीवन अजुनही दुर्लक्षितच नव्हे तर लांछनीत झाले. चीनने ग्रामीण क्षेत्रात प्रत्येक गावात एक डाक्टर असावा यासाठी गावातीलच वैद्यांना प्रशिक्षण दिले. Bare Foot Doctors ची निर्मिती केली. भारतीय सर्व वैद्यकीय सेवा नागरी क्षेत्रात सिमित आहेत व अशा स्थितीत मांग स्त्री दुर्लक्षित आहे.

मांग सुईन स्त्री ही अजूनही बÚयाच अंशाने आदिम जीवन जगत असलेली स्त्री असून तिचा व्यवसाय, अर्थकारण व धर्म हे अत्यंत प्राचीन स्वरूपाचे आहेत. भारतीय स्त्रियांच्या इतिहास लेखनात या स्त्रीला दुर्लक्षित केले तर क्वचितच तिच्या बरोबरीचे कर्तृत्व असणारी दुसरी स्त्री आपणास दिसेल या पाश्र्वभुमीवर सामाजिक मानवशास्त्रीय अंगाने मांग सुईन स्त्रीचा सर्वागिण अभ्यास महत्वाचा ठरतो. स्त्री रोग म्हणजे गरोदरपण, बाळंतपण, महावरीचा आजार, पदर जाणे, वंध्यत्व, लैंगिक जीवनातील समस्या, कॅन्सर, प्रजनन इंद्रियाचे संक्रमक आजारे असतात.

ग्रामीण स्त्रीयांपैकी 92 टक्के स्त्रीयांना स्त्रीरोग आहे. 50 टक्के स्त्रियांना जनन इंद्रियांचा दोष आहे. त्यातील फक्त 8 टक्के स्त्रीयांनी वैद्यकिय उपचार घेतात

आधुनिक वैद्यकीय जगाशी त्यांचा क्वचित आणि दुरूनच संबंध येतो.

ग्रामीण क्षेत्रामध्ये स्त्रीयां या आपल्या आजाराविषयी वयोवृद्ध स्त्रियांशी किंवा सुईण बाईशी संवाद साधून त्यांच्यामार्फत आपल्या आजारावर उपचार करतात. ग्रामीण स्त्रियांना कुठलाही लैंगिक आजार असेल तर ती सागायला लाजते आणि पुरूष डॉक्टरकडे तर ती जायला तयार नसते.

पदर जाणे, पांढरे पाणी जाणे, उष्णता/गर्मी, बाळंतपण व गर्भपात, गर्भाशय आजार, कमजोरी, बंध्यत्व, लघवीत अंगार, रात आंधळेपणा, मूळव्याध, मासिक पाळी, विटाळ, गरोदरपणातील आजार, खैरा धरणे, नैसर्गिक गर्भपात, बाळंत आजार, स्तनाचे आजार, अंग बाहेर येणेयाविषयी समजुती आणि गैरसमजुती याविषयी महिलांच्या गुपिताचा कानोसा डॉ. रानी बंग यांनी 100 सुईण, 200 स्त्री रूग्ण आणि 30 पुरूष, ग्रामीण स्त्रियांचा गट असा 600 लोकांशी संवाद साधून घेतला आहे.

स्त्री रोगाचे अध्ययन करतांना त्यांच्या असे निदर्शनास आले की, वैद्यकीय स्त्री रोग शास्त्राच्या सीमेपलीकडच्या खूप काही गोष्टी या बायाच्या जीवनात दडलेल्या आहेत आणि

यांचा कानोसा घेणे गरजेचे आहे. एक स्त्रीच एका स्त्रीचे दुख व आजार समजू शकते कारण सर्वांचा मार्ग तो एकच. ही व्यथा केवळ एक किंवा दोन गावातील नसून संपूर्ण विश्वाची आहे.

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

ग्रामीण स्त्रीला कुठलेही लैंगिक आजार झाले तर ती गावातील वैदू, दायी, सुईण यांच्याकडून उपचार करवून घेते. बाळ व बाळजन्माशी संबंधीत काम करणारी सुईण हिच्याशी मुक्तपणे संवाद साधते व गावठी औषधी उपचार करवून घेतात. याने जर आराम पडत नसेल तरच त्या डाॅक्टर व दवाखाना गाठतात. ती टक्केवारी म्हणजे 100 मधून 8 टक्के आहे. अजूनही या ग्रामीण स्त्रीया वैद्यकिय सोयीचा लाभ घेत नाही.

डॉ. राणी बंग सारख्या तज्ञ चिकित्सक ला जेव्हा सुईणीच्या ज्ञानावर विश्वास ठेवावा लागतो. तेव्हा सुईणीचे काम करणारी स्त्री अज्ञान होती असे म्हटल्या जात नाही त्या आधारावर तिच्यावर दुर्लक्ष करणे चुकीचे ठरते

परंपरेने एवढी महत्वाची कामे या स्त्रीद्वारे केली जात असतांना देखील जातीव्यवस्थेत अस्पृश्य जातीत तिचा आंतरभाव होतो व त्यातून जातीय छळास ती बळी पडते. तसेच विकास व आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत नवीन आरोग्य सेवांचा सुळसुळाट होऊन मांगीणीच्या बाळजन्माच्या/सुईणीच्या कार्यातून अतोनात पैसा मिळतो हे तथाकथित सभ्य समाजाला उमजल्यावर Gynocology या विद्याशाखेअतंर्गत स्त्रीरोग व प्रसुती तज्ञांची एक फोज तयार झाली आणी मातंगीचे जीवन अजुनही दुर्लक्षितच नव्हे तर लांछनीत झाले. चीनने ग्रामीण क्षेत्रात प्रत्येक गावात एक डॉक्टर असावा यासाठी गावातीलच वैद्यांना प्रशिक्षण दिले. Bare Foot Doctors ची निर्मिती केली. भारतीय सर्व वैद्यकीय सेवा नागरी क्षेत्रात सिमित आहेत व अशा स्थितीत मांग स्त्री दुर्लक्षित आहे.

मांग सुईन स्त्री ही अजूनही ब–याच अंशाने आदिम जीवन जगत असलेली स्त्री असून तिचा व्यवसाय, अर्थकारण व धर्म हे अत्यंत प्राचीन स्वरूपाचे आहेत. भारतीय स्त्रियांच्या इतिहास लेखनात या स्त्रीला दुर्लक्षित केले तर क्वचितच तिच्या बरोबरीचे कर्तृत्व असणारी दुसरी स्त्री आपणास दिसेल या पाश्र्वभुमीवर सामाजिक मानवशास्त्रीय अंगाने मांग सुईन स्त्रीचा सर्वांगिण अभ्यास महत्वाचा ठरतो.

मातंगी हे दुर्गेचेच रूप आहे. प्राचीन काळी मातंग ऋषी सर्व जीवांना वश करण्याची सिद्धी प्राप्त व्हावी म्हणून तप करीत होते. हजारो वर्षे त्यांचे तप चालले होते. एके दिवशी त्रिपुरसुंदरीच्या नेत्रातून एक तेजोगोल बाहेर पडला आणि त्यातून श्याम वर्णाची एक देवी निर्माण झाली. मातंग
ऋषकरिता प्रकटली. म्हणून ती श्मातंगीश्या नावाने प्रसिद्ध झाली.'' मातंग स्त्रीला देवीचे रूप देण्यात आले. तिच्यापासून पुढे समाजाची उत्पत्ती झाली. दुर्गा मातेच्या रूपाप्रमाणेच तिचा उल्लेख रेणुकेच्या संदर्भातदेखील केलेला आहे. शितल देवीच्या स्थळाजवळ बहुधा हिचे स्थान असते.'' तसेच 'रेणुका देवी' च्या संदर्भातून मातंग स्त्रीचा उल्लेख हा प्राचीन काळापासून असलेला दिसून येतो.

जमदग्नी भार्या रेणुका हिच्या हातून एके दिवशी काही प्रमाद घडला म्हणून जमदग्नी तिच्यावर रागावला. त्याने आपला मुलगा परशुराम याला तिचे शिर तोडायला सांगितले. त्याच्या एका बाणाने रेणुकेचे शिर तर तुटलेचय शिवाय तिच्या मागे तिची मादिग जातीची दासी होती, तिचेही शिर तुटले. पुढे जमदग्नीचा क्रोध शमला. त्याने रेणुकेला पुनःश्च जीवदान देण्याचे मान्य केले. मग परशुराम त्या उद्योगाला लागला. रात्रीच्या अंधारात तो धडाला शिर चिकटवित असता
त्यांच्या हातून एक चूक झाली. त्याने रेणुकेचे मस्तक दासीच्या धडावर आणि दासीचे मस्तक रेणुकेच्या धडावर चिकटवले. त्या दोघीही जिवंत झाल्या. सकाळी ही चूक परशुरामाला व जगदम्रीलाही कळाली, पण आज्ञाधारक पुत्राकडे पाहून जमदग्नीने क्रोध न करता रेणुकेचे शिर ज्या धडावर चिकटविले, तिचा आपली पत्नी म्हणून स्वीकार केला. ती मादिग दासी पुढे मातंगी या नावाने प्रसिद्ध झाली. प्राचीन काळापासून मातंगी अस्तित्वात होती. मातंग स्त्रीच्या उत्पत्तीसंबंधी अशा काही कथा दिलेल्या दिसून येतात. उत्पत्तीच्या संदर्भात मांग स्त्रियांच्या लोककथा ह्या ऐतिहासिक दृष्टीने तिची पार्श्वभूमी सांगतात. मातंग हा हिंदू धर्मीय समाज आहे हिंदूचे सनवार आणी देवदेवताचे ते उपासक आहे.

अंबाबाई, जोखाई, मरीआई, म्हसोबा, मांगीरबाबा, लक्ष्मीआई, काळूबाई खंडोबा आणि यलम्मा ही त्यांची दैवत आहेत. देवदेतांना मुले, मुली सोडण्याची प्रथा मातंग समाजात रूढ होती. विशेषतारू खंडोबाला मुरळी वाघ्या सोडणे यल्लामाला जोग-जोगतीन सोडण्याची आणि मरीआईला पोतराज सोडण्याची प्रथा या समाजात कोंबडे बकरे कापने, जागरण-गोंधकघालने, देव वाढविणे देवीला रेडे कापण्याची प्रथा आजही प्राचीन काळापासून चालू आहे. (चैत्रपौर्णिमाच्या वाचण्या दिवशी नेवासा) (लाखदेवी) वंशाला दिवा मिळण्यासाठी हीची उपासना करण्यात येते.

सवाशिन बाई अपत्य प्राप्त करण्यासाठी हीची उपासना करतात नवस बोलेले जातात. नवसबोलण्यासाठी लाखो लोक श्रद्धेने वरखडच्या जत्रेला एकत्र जमतात. 'पोतराज देखील रंगबिरंगी पोशाख घालून शोभा वाढवितात. (महाकुट येथील मुर्ती)
हेही प्रकार धार्मिक रूढी आणि परंपरा म्हणुन या समाजात पाळल्या जातात. (नगर) वरखडच्या,

श्री महालक्ष्मी देवी मंदिर वरखेड नेवासा, अहमदनगर, (उत्खननात मिळालेली मुर्ती) नेवासे, जि. अहमदनगर महाराष्ट्र, मरीआई (मातामाय)

महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण दक्षिण भारतातील समाजात मरीआई ही पुंजल्या जाते. 'मरिअम्मा' या नावाने देखील ती ओळखली जाते. पावसाची देवी म्हणुन तीची महाराष्ट्र तमिळनाडू, कर्नाटकच्या, ग्रामीण भागात प्रमुख देवी म्हणून उपासना केली जाते. साधारणतरू शरदऋतुच्या काळात हीच्या उत्सवाला सुरूवात होते. मुख्यता पाऊस आणने आणि कॉलरा, चेचक, चिकन पॉक्स (माता) यासारख्या रोगांपासून रक्षण करते. तीची उपासाना ग्रामदेवता म्हणून केली जाते. 'एल्लम्मा' चे संस्कृत नाम' रेणूका' एल्लमा, रेणुका भूदेवी हि तिन्ही नाव पर्यायी एकाच देवीसाठी वापरली जाते. ह्या मरीआईचे मंदिर मातंग वस्तीच्या आत किंवा आजुबाजुला आढळून येते. 'संतान दात्री देवी', वाझं स्त्रीया संतानप्राप्तीसाठी उपासना करतात. अशी ख्याती आहे.

रेणुका ही भूदेवी आहे 'रेणुका' हे नाव पृथ्वी वाचक आहे रेणु का = रेणुमयी = पृथ्वी 'वारूळ' हे रेणुकेच्या उपासनेसाठी वापरले जाणारे नैसर्गिक प्रतीक आहे. वारूळ हे पृथ्वीच्या गर्भाशयाचे प्रतीक आहे 'पोटुटु' हा दक्षिणी शब्द 'पोट' (गर्भाशय) वारूळ रूपाने पूजिली जाणारी 'मातंगी' सांतेरी देवी रेणूकेशी समरूप आहे.

'मातंगी पुर्णत्व उच्चते

ओम ही मातंगी महामाये
सदानंद स्वरूपिणी ।
प्रणामामी सदा अंबे 'मातंगी'
मधुरा नाना।

शिवशक्तीच्या दहाव्या अवतार पैकी नववा अवतार शंकर पार्वतीने मातंग-मातंगी म्हणुन घेतला मातंगी महादेवीची करती असून सर्व देवदेवताची वरदायीणी आहे. मातंगी देवीला संतती व संपत्ती राखणारी देवी म्हणून पूजले जाते. दक्षिण भारतात 'मातंगी' स मांगम्मा असे म्हणतात. तीचे देवस्थान तिरूपती, तुळजापूर, कोल्हापूर येथे आहेत.

मातृदेवता ही मानवी सांस्कृतीच्या इतिहासातील 'आद्यशक्ती' आहे. तिला मानवाने सर्व परिस्थान दिले विविध रूपात पाहिले, विविध रूपात पूजले जाते.

ऋग्वेदातल्या आदितीपासून ते आजही दारी येणार्या पोतराज, गोंधळी, जोगतीनी यांच्या तोंडून भवानी रेणूकेपर्यंत शक्तीचे महिमान एकायला मिळते.

सिंधू नदीच्या तीरी मिळालेल्या तीन सहशस्त्रकापूर्वीच्या मातृमुर्तीपासून खेडोपाडी आजही प्रभावशाली असलेल्या ग्रामदेवतापर्यंत उपासनेचे सातत्य आढळते.

(विचित्ररूपा देवी द तेर. जि. उस्मानाबाद) (योनरूपात मुर्ती)

(महाकुट द 'शांकन्भरीमाहात्म्या- शिव आणि शक्ती दोघांना प्रिय असलेले ठिकाण) माधकुटरेवर 'लज्जागौरी' नवलिंगाच्या समुहात आहे.

आलंमपूर येथे ती नव ब्रह्ममेश्वर, नवलिंगेश्वर म्हणुन प्रसिद्ध आहे. नवदुर्गा, नवरात्री, देवी संबंध यातला विचार घायला हवा.

'लज्जागौरी' विचित्रमुर्ती

या सर्व मुर्तीचे वैशिष्टये असे की 'योनी' च्या दर्शनाला उठाव देण्यासाठी पाय गुडघ्यात दुमडून बाजुला घेतलेले. काही मुर्ती नाभीपासून खालच्या भागाच्या आहेत तर काही खाद्यापासून खालच्या भागाच्या आहेत. स्तनांना उठाव देण्यासाठी हातही बाजुला घेतले आहे. या मातृविदर्शक इंद्रियांना उठाव देणार्या आहेत. कमळाशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. मुखाच्या जागी काही मुर्तीना कमळ रेखले आाहे.

महाकुठ येथे 'लज्जागौरी' या नावाने प्रसिद्ध असलेल्या या देवीची उपासना स्त्रीया संतान प्राप्तीसाठी नवस करतात. ''संतती देणारी व राखणारी देवता'' म्हणून पूजली जाते.

कोणत्याही देवतेचा उपासकनिरपेक्ष शोध हा निव्वळ ठरल्या वाचून राहणान नाही.

देव-दानवां नरे निर्मिले' हे सत्य या गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

योनी प्रतीक म्हणून नैसर्गिक वारूळाची उपासना अतिप्राचीन काळापासून आजपर्यंत दक्षिण भारतात अंखडे प्रचलित आहे. वारूळ हे फार नाजूक असल्यामुळे वारूळ साहाय्य घडीव मुर्तीचेप्रचलन क्वचित करण्यात आले. वारूळाच्या शिलारूप प्रतिकानंतर नाभीपर्यंतच योनिमूर्ती घडविल्या जावू लागल्या. तसेच प्रसवाबरोबर पोषणाचाही 'मातृत्वासी' संबंध असल्यामुळे योनीप्रमाणे स्तनाचा उठाव देनाच्या मुर्तीची निर्मिती होत गेली.

या भुदेवीची आंध्र-कर्नाटक, महाराष्ट्रात भूदेवी म्हणुन उपासना होते.

मरीआई ही माहार-मांगाची मुख्य देवता दक्षिणेतील आदिम मातृदेवते पैकी एक 'मातंगी'.
महाराष्ट्रात पेरणीच्या वेळी मांगीनीची ओटी भरण्याची प्रथा आहे. पृ. ६० लज्जागौरी, माहुर, तुळजापूर आणि सौदत्ती येथे मातंगी देवीची ठानी आहेत. त्या ठिकाणी महार-मांग जातीचेच पुजारी आहेत. मातंगी देवीचे मुख्य निवास्थान म्हणून मातापूर अथवा माहूर या क्षेत्राचा उल्लेख वारंवार येतो हे स्थान आजही महाराष्ट्रात असले तरी आंध्रप्रदेशाला अगदी लागून आहे. 'मादिगा' हे आंध्रकर्नाटकातील मांगच आहेत. या दोन्ही जातीमध्ये 'मातंगी' देवीची अनेक कथा, गाथा प्रचलित असून तिलाच एल्लामा आणि रेणुका अशी पर्यायनाने वापरली जातात.
रेणुका-मातंग आणि मातंगी प्रमाणेचे

महाराष्ट्र सातारा, सोलापूर, कोल्हापूर या भागात आणि क्वचित अज्यत्रही गजलक्ष्मीही ग्रामदिवतेच्या स्वरूपात पूजली जाते. कोल्हापूरात तीची ठाणे गावोगा आहे.

भविश्वरी, भावका, भावकाई सुलभ प्रसुतीसाठी तीची उपासना केली जाते.

मुलतरू सुफलेनाची देवता म्हणुन पुजल्या जाते.

देवीच्या उपासनेत कवडीचे स्थान.

रेणुका, एल्लमा, मातंगी, मरीआई, भवानी महालक्ष्मी इत्यादी नावाने पुजल्या जाणार्या देवीच्या उपासनेत कवडीला असाधारण महत्व आहे. गोंधळी, भुव्ये, पोतराज, मातंगी जोगती, जोगतिणी हे देवीचे उपासकवर्ग आपल्या अंगाखाद्यावर कवड्याचे नानापरी अलंकार परिधान करतात.

उपासकांची 'लांछने' (अलंकार) पुजा साहित्य, कवडयानी सजलेली असते. देवीच्या उपासनेत कवडीचे हे असाधारण स्थान कवडीच्या योनिसादृश्य आकारामुळे आहे. कवडी ही वस्तु जगभरातील संस्कृतीमध्ये योनिप्रतिक मानली गेली.

''सामव्यतरू बांझपणाचे निराकरण करण्यासाठी कवडयांचा नेहमी वापर केला जातो. अन्य सर्व सुफालनकारक वस्तुप्रमाणेच कवड्यामध्ये सर्व प्रकारच्या अनिष्ठानचे निराकरण करण्यामागे सामर्थ असल्याची श्रद्धा आढळते.

कवडी योनीप्रतीक म्हणुन स्वीकारली गेल्यामुळे सर्जनाच्या देवतांना ती प्रिय मानल्या गेली. कवळी ही जीवनदात्री, संतानदात्री, सौभाग्यदात्री अशी मानली गेली आहे. विवाहप्रसंगी वधुला कवडी भेट देणे हे संतान दायक मानले जाते. कवडीच्या ठायी मातृदेवाच्या निवास असतो.

प्रस्तुत अध्ययनातुन निष्कर्षात येते की, ही मांतगी देव संतान प्राप्त आणि संतान दात्री देवता म्हणुन सर्वत्र पुजल्या जाते आणि तीची उपासना केली जाते. मातंग स्वतरूला मातंगी मकळू संबोधतात. 'मातंगी' ही मातृदेवता तीच्या पासून उत्पत्ती ते सांगतात मातंग स्त्री या परंपरागात सुईणध्दईण गावगाडयात त्यांचा व्यवसाय करीत आल्या त्यांचे अध्ययन केले असता आपण निष्कर्ष काढू शकतो की, बाळ जन्म सुलभ प्रस्तु, सुफलनाशी संबंधीत देवतेशी यांचा घनिष्ठ संबंध निदर्शनास येते. इतर जाती जमाती तुलना करता ग्रामीण क्षेत्रातील बर्याच जाती जमाती पैकी फक्त मातंग स्त्रीया हे परंपरागत सुईण व दाईणीचे काम करत आल्या आहेत आणि काही करतात देखील. प्रसुती नाही पण बाळ जन्माशी संबंधीत कामासाठी आजही ग्रामीण क्षेत्रात त्यांचाच नाव घेतल्या जाते, बोलविल्या जाते. स्त्री रोग तज्ञ म्हणून तर तीची स्वतंत्र ओळख आजही ग्रामीण क्षेत्रात आहे आणि आपण तीची प्राचिनता जपली पाहिजे. बांझपणाचे निराकरण करण्यासाठी कवडयांचा नेहमी वापर केला जातो. अन्य सर्व सुफालनकारक वस्तुप्रमाणेच कवड्यामध्ये सर्व प्रकारच्या अनिष्ठानचे निराकरण करण्यामागे सामर्थ असल्याची श्रद्धा आढळते.

कवडी योनीप्रतीक म्हणुन स्वीकारली गेल्यामुळे सर्जनाच्या देवतांना ती प्रिय मानल्या गेली. कवळी ही जीवनदात्री, संतानदात्री, सौभाग्यदात्री अशी मानली गेली आहे. विवाहप्रसंगी वधुला कवडी भेट देणे हे संतान दायक मानले जाते. कवडीच्या ठायी मातृदेवाच्या निवास असतो.

प्रस्तुत अध्ययनातुन निष्कर्षात येते की, ही मांतगी देव संतान प्राप्त आणि संतान दात्री देवता म्हणुन सर्वत्र पुजल्या जाते आणि तीची उपासना केली जाते. मातंग स्वतरूला मातंगी मकळू संबोधतात. 'मातंगी' ही मातृदेवता तीच्या पासून उत्पत्ती ते सांगतात मातंग स्त्री या परंपरागात सुईणध्दईण गावगाडयात त्यांचा व्यवसाय करीत आल्या त्यांचे अध्ययन केले असता आपण निष्कर्ष काढू शकतो की, बाळ जन्म सुलभ प्रस्तु, सुफलनाशी संबंधीत देवतेशी यांचा घनिष्ठ संबंध निदर्शनास येते. इतर जाती जमाती तुलना करता ग्रामीण क्षेत्रातील बर्याच जाती जमाती पैकी फक्त मातंग स्त्रीया हे परंपरागत सुईण व दाईणीचे काम करत आल्या आहेत आणि काही करतात देखील. प्रसुती नाही पण बाळ जन्माशी संबंधीत कामासाठी आजही ग्रामीण क्षेत्रात त्यांचाच नाव घेतल्या जाते,

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

बोलविल्या जाते. स्त्री रोग तज्ञ म्हणून तर तीची स्वतंत्र ओळख आजही ग्रामीण क्षेत्रात आहे आणि आपण तीची प्राचिनता जपली पाहिजे.

संदर्भ ग्रथ सूची

- आत्रे त्रि. ला, 'गावगाडा', ह.वि. मोटे प्रकाशन, मुंबई, 1956
- आंबेडकर डॉ. बी. आर, 'महार आणि त्यांचे वतन', अशोक प्रकाशन, नागपूर - 1977.
- दांडेकर जगताप 'गावरहाटी', मोटे प्रकाशन, मुंबई - 1963
- मांडे प्रभाकर, 'गावगाडयाबाहेर', परिमल प्रकाशन, औरंगाबाद - 19830.
- वानखेडे चंद्रकांत, 'मातंग: प्राचीनता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा' सुगावा प्रकाशन सदिाशिवपेठ, पुणे - 1995.
- खडसे डॉ. भा. कि., 'मांग जात समाजशास्त्रीय अध्ययन', मंगेश प्रकाशन, नागपूर - 1990.
- आंबेडकर डॉ. बी. आर, 'शुद्रपुर्वी कोण होते', सुगत प्रकाशन, नागपूर, 1974
- बंग डॉ. राणी, 'कानोसा', इंडियन एक्युकेशन सोसायटी, मुंबई, 2003.
- गवळी पी. ए., 'पेशवे कालीन समाज व जातीय संघर्ष' प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, 1982.
- कर्वे इरावती, 'मराठी लोकांची संस्कृती', देशमुख आणि कंपनी पुणे, 1962.
- कीर धनंजय, 'महात्मा ज्योतिराव फुले' पाप्युलर प्रकाशन, मुंबई, 1968.
- माटे श्री. म., 'अस्पृश्यांचा प्रश्न', 624 सदाशिवपेठ, पुणे, 1963.
- सोमवंशी बी. सी, 'महाराष्ट्रातील मांग', आनंद प्रकाशन, औरगांबाद, 2006
- नारगलकर राहुल, 'मातंग समाज प्रेरणा आणि चळवळ', स्वानंद प्रकाशन पुणे, 2008.
- सोमवंशी बी. सी., 'भारतीय जाती संस्थेत मातंगाचे स्थान आणि महार मांग संबंध' आनंद प्रकाशन, औरंगाबाद, 1989.
- अजुने दिलीप, 'मातंग समाज स्थिती आणि गती', अग्रवाल, पुस्तक समिती जालना, 2006.
- सिंदगीकर 'लहुजे साळवे आणि मातंग समाज', साद प्रकाशन, औरगांबाद, 2009.
- पाखरे राजन, 'मातंग समाज शोध - बोध व आर्थिक अनुवाद', शब्दनिनाद प्रकाशन, ठाणे.
- ढेरे रा. ची, 'लज्जागौरी', विद्या प्रकाशन, पुणे